आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७ वाजता

१० मे २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना महायुतीमध्ये सहभागी होण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आवाहन

- हा प्रस्ताव शरद पवार यांनी फेटाळला, जनमत विरोधात असल्यानं अस्वस्थ होऊन मोदी संभ्रम निर्माण करणारी विधानं करत असल्याची टीका

- आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, तर वादग्रस्त जाहिराती प्रकरणी भाजपा प्रदेशाध्यक्ष चं्द्रशेखर बावनकुळे यांच्याविरोधात गुन्हा दाखल

**आणि**

- नरेंद्र दाभोलकर हत्येप्रकरणी सचिन अंदुरें आणि शरद कळसकर यांना जन्मठेप /विरेंद्र तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची पुराव्याअभावी सुटका

**<><><><><>**

उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना महायुतीमध्ये सहभागी होण्याचं आमंत्रण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नंदुरबारमधल्या सभेत दिलं. प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होऊ शकतात, यासंदर्भातलं वक्तव्य शरद पवार यांनी काही दिवसांपूर्वी केलं होतं. त्या अनुषंगानं मोदी बोलत होते. ते म्हणाले…

**होल्ड प्रधानमंत्री २**

अनुसूचित जाती-जमाती आणि ओबीसींचं आरक्षण कमी करुन धर्माच्या आधारे आरक्षण देऊ देणार नाही, याचा पुनरुच्चार मोदी यांनी आज केला. महाविकास आघाडी आरक्षण SC, ST आणि OBC चे हटवण्यासाठी कार्यरत

आहे. आरक्षण वाचवण्याचं आश्वासन आपण गेले कित्येक दिवस देत आहोत. मात्र, काँग्रेस या मुद्द्यावर काहीही बोलायला तयार नसल्याचं ते म्हणाले. राम मंदिराच्या मुद्द्यांवरुन काँग्रेसनं घेतलेल्या भूमिकेवर त्यांनी टीका केली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी प्रधानमंत्र्यांच्या संदर्भात वापरलेल्या आक्षेपार्ह शब्दांचा त्यांनी समाचार घेतला. देशातल्या सर्व माता-भगिनी माझ्या संरक्षक आहेत, असं ते म्हणाले. सीकल सेल ॲनिमिया निर्मुलनसह नंदुरबारमधल्या विकासकामांचा दाखला मोदी यांनी यावेळी दिला.

**<><><><><>**

महायुतीसोबत येण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा प्रस्ताव शरद पवार यांनी फेटाळला आहे. मोदी यांच्याविरोधात जनमत तयार होत आहे. यामुळे ते अस्वस्थ झाले असून संभ्रम निर्माण करणारी विधानं करत असल्याचं पवार म्हणाले. ते आज पुण्यात बातमीदारांशी बोलत होते.

जे देशाच्या हिताचे नाहीत ते आमचे सहकारी असणार नाहीत, असं ते म्हणाले. गांधी-नेहरुंच्या विचारधारेवर आमचा पक्ष चालतो. समाजातल्या सर्व घटकांना एकत्र ठेवून आम्ही काम करतो, त्यामुळं अशा प्रस्तावाला पाठिंबा देता येणार नाही. नरेंद्र मोदी यांची अलिकडची सगळी भाषणं समाजात अविश्वास निर्माण करणारी आणि देशाच्या दृष्टीनं घातक आहेत, असं ते म्हणाले.

दिल्ली आणि झारखंडच्या मुख्यमंत्र्यांना झालेल्या अटकेवरूनही शरद पवार यांनी नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली. केंद्र सरकारचा सहभाग असल्याशिवाय ही अटक होऊ शकत नाही. या देशातली संसदीय लोकशाही मोदींमुळे संकटात आली असल्याचा आरोप पवार यांनी केला.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील मतदानानंतर भारतीय जनता पक्ष १५०, जागाही जिंकू शकत नाही हे स्पष्ट झाले आहे. पराभवाच्या चिंतेतून नरेंद्र मोदी यांनी शरद पवार यांना एनडीएमध्ये सहभागी होण्याची जाहीर ऑफर दिली आहे, असा दावा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. भाजपाने लोकसभा निवडणुकीत सर्व प्रकारची कार्ड वापरली पण कोणतेच कार्ड चालले नाही, हिंदु-मुस्लीम कार्डही फेल गेलं, त्यामुळे नरेंद्र मोदी यांना दररोज नवे कार्ड वापरावे लागत आहे, असा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

पोलीस अधिकारी हेमंत करकरे यांच्या मृत्यूच्या संदर्भात काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या वक्तव्यावरुन त्यांच्याविरोधात नागपुरात गुन्हा दाखल केला आहे. तसंच भाजपानं वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित केलेल्या वादग्रस्त जाहिराती प्रकरणी प्रदेशाध्यक्ष चं्द्रशेखर बावनकुळे यांच्याविरोधात ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी मुंबईत वार्ताहर परिषदेत दिली. निवडणूक आयोगाकडे प्राप्त झालेल्या तक्रारींवरुन हा गुन्हा दाखल झाला आहे. बारामती लोकसभा मतदारसंघात मतदानाच्या वेळी पैसे वाटप, दमदाटी, आचारसंहिता भंग याप्रकरणी निवडणूक आयोगाच्या आदेशावरुन ४ गुन्हे दाखल झाले आहेत. याशिवाय स्थानिक पोलिसांमध्येही काही गुन्हे दाखल झाल्याची माहिती त्यांनी दिली.

मुंबईतल्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर तयारीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगानं आज मुंबईत बैठक घेतली. त्यात निवडणूक यंत्रणा, पोलीस आणि महापालिका यांचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते.

राज्यातल्या निवडणूक यंत्रणांनी आतापर्यंत ६१४ कोटी १४ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. त्यात २४४ कोटी रुपयांचे अंमलीपदार्थ, १६२ कोटी रुपयांचं सोनं-चांदी, ५८ लाख ३४ हजार लीटर मद्य, १०१ कोटी रुपयांच्या इतर वस्तूंचा समावेश आहे. आचारसंहिता भंगाच्या प्राप्त झालेल्या ५ हजार ४३३ तक्रारींपैकी ५४१५ तक्रारी निकाली काढण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांसाठी १० जून रोजी मतदान प्रस्तावित आहे. मात्र शाळांना सुटी असल्यानं हे मतदान शाळा सुरू झाल्यावर घ्यावं अशी विनंती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाला प्राप्त झाली होती. ती आज केंद्रीय निवडणूक आयोगाला पाठवल्याची माहिती चोकलिंगम यांनी दिली.

**<><><><><>**

अहमदनगर लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार सुजय विखे पाटील यांच्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज प्रचारसभा घेतली. जिल्ह्यातले शेतीचे, पिण्याच्या पाण्याचे, रोजगाराचे प्रश्न सोडवायचे आहेत. त्यासाठी निधी आवश्यक आहे. विकास करायचा असेल तर सत्तेतला खासदार असणं गरजेचं आहे, असं पवार या वेळी म्हणाले. या सभेत सुजय विखे पाटील यांच्यासह माजी मंत्री राम शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब नाहटा, राजेंद्र नागवडे उपस्थित होते.

**<><><><><>**

अंधश्रद्धा निर्मुलन क्षेत्रात कार्यरत ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येप्रकरणी त्यांच्यावर गोळीबार करणाऱ्या सचिन अंदुरें आणि शरद कळसकर यांना पुण्यातल्या विशेष न्यायालयानं जन्मठेप आणि ५ लाख रुपये दंडाची शिक्षा

सुनावली. या दोघांनी गोळी झाडल्याची कबुली दिली होती. तर पुराव्या अभावी डॉ. विरेंद्र तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची मुक्तता केली आहे. याप्रकरणात UAPA अंतर्गत लावलेले आरोपही न्यायालयानं फेटाळले.

दोषी असलेल्या दोघांना शिक्षा देण्याच्या निर्णयाचं दाभोलकर कुटुंबियांनी स्वागत केलं आहे. मात्र पुराव्याअभावी मुक्तता केलेल्यांना शिक्षा व्हावी यासाठी उच्च न्यायालयात जाणार असल्याचं दाभोलकर यांची कन्या मुक्ता दाभोलकर यांनी म्हटलं आहे. २० ऑगस्ट २०१३ रोजी पुण्यात सकाळी दाभोळकर यांची हत्या झाली होती.

**<><><><><>**

लखन भैय्या बनावट एनकाऊंटर प्रकरणी माजी पोलीस अधिकारी प्रदीप शर्मा यांना सर्वोच्च न्यायालयानं जामीन मंजूर केला आहे. मुंबई उच्च न्यायालयानं शर्मा यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. त्यापच्रकरणी त्यांनी जामीनासाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. राज्य सरकारच्या वकीलांनी जामीनाला आक्षेप नसल्याचं सांगितल्यावर सर्वोच्च न्यायालयानं त्यांचा जामीन मंजूर केला.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज गुजरात टायटन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात सामना होणार आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर आता थोड्याच वेळात म्हणजे साडेसात वाजता खेळ सुरू होईल.

चेन्नई सुपर किंग्ज संघानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

अक्षय तृतीयेच्या मुहुर्तावर सोनं आज तोळ्यामागे सुमारे दीड हजार रुपयांनी महागलं. २४ कॅरेट सोनं काल ७१ हजार ५०० रुपये होतं. त्यात आज दीड हजार रुपयांची वाढ झाली आणि ७३ हजार १० रुपये दरानं सोन्याची विक्री होत होती. २२ कॅरेट सोन्याचे दरही १ हजार ४७० रुपयांनी वाढून तोळ्यामागे ७१ हजार २६० रुपये झाले.

**<><><><>**

**राज्यात** काही भागात आज वादळी वाऱ्यासह पावसाने जोरदार हजेरी लावली. यामुळे काही ठिकाणी शेतीचं नुकसान झालं. तर शहरी भागात पावसामुळे उकाड्यापासून दिलासा मिळाला.

पुणे शहर आणि परिसरातही आज पाऊस झाला. त्यामुळं स्वारगेट स्थानक परिसरात पाणी साचलं होतं.

**नाशिक** जिल्ह्यात आज दुपारनंतर पावसाला सुरुवात झाली. चांदवड तालुक्यातल्या कानमांडळे गावात वादळी वाऱ्यामुळे दहा ते बारा घरांचं नुकसान झालं. तर वीज पडून एक गाय मरण पावली. सिन्नर तालुक्यातल्या **ठाणगाव** इथंही पावसानं झोडपून काढलं.

**कोल्हापुरात** दुपारी अचानक ढग दाटून आले आणि पावसाला सुरुवात झाली. जिल्ह्यातल्या पारगाव, शिये, टोप संभापूर भागात जोरदार पाऊस झाला.

**अहमदनगर** जिल्ह्यातही पावसानं हजेरी लावली. मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यानं शहरातल्या रस्त्यावरून पाणी वाहत होतं. ग्रामीण भागात पीकांचं नुकसान झाल्याचंही वृत्त आहे.

**<><><><>**

गेल्या २४ तासांत राज्यात सर्वात जास्त म्हणजे ४३ डिग्रीपेक्षा जास्त तापमान अकोला इथे नोंदवण्यात आलं. पुढील दोन दिवस मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, गारपीट आणि सोसाट्याचा वारा असण्याची शक्यता नोंदवली आहे. पडण्याची शक्यता आहे. कोकणातही तुरळक ठिकाणी मेघ गर्जनेसह वीजांचा कडकडाट आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता पुणे वेधशाळेने वर्तवली आहे.

**//<><><><><>//**